तिफण

वर्ष : १४ वे । अंक ४ था
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च - २०२३
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



यशवंतराव चव्हाण
विशेषांक

UGC Care Listed Journal, ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

तिफण

MAH MAR 34737/13/2009 - TC

वर्ष १४ वे, अंक - ४ था जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

यशवंतराव चव्हाण विशेषांक

◆ संपादक ◆

डॉ. शिवाजी हुसे

◆ अतिथि संपादक ◆

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

डॉ. राजकुमार मरे

◆ संपादक मंडळ ◆

डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. सुभाष बागल
डॉ. सुभाष शेकडे
डॉ. राजकुमार मुसणे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. रामचंद्र झाडे
डॉ. सुखदेव इगारे
डॉ. सुधाकर जाधव
डॉ. दिलिप बिरुटे
डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. रंजना कदम

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या संपादक सहमत असतीलच असे नाही, या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी,हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद - १३१४०३, मो. ९९०४००३९९८

भाग - १ अनुक्रमणिका

अनु क्र.	लेख व लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	चरित्र संपन्न व्यक्तिमत्व यशवंतराव **प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण**	१-५
२	आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण **बालाजी गंगावणे**	६-११
३	यशवंतराव चव्हाण यांचे बहुआयामी कारकीर्द : एक अभ्यास **प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा**	१२-१५
४	यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि विचार **प्रा. डॉ. गीतांजली बी. भोराडे**	१६-२०
५	यशवंतराव चव्हाण : एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व **डॉ. संजय जीवनलाल सिंगनजुडे**	२१-२७
६	यशवंतराव चव्हाण यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा अभ्यास **डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे**	२८-३३
७	ज्ञानमंदिरे उभारणारा नेता : यशवंतराव चव्हाण **प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश**	३४-३७
८	आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक योगदान **प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम**	३८-४४
९	आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे**	४५-४९
१०	यशवंतराव चव्हाण - कुशल प्रशासक **डॉ. गणेश बालासाहेब बनसोडे** **डॉ. एन. बी. आघाव**	५०-५३
११	यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्यांचा ऐतिहासिक वारसा **डॉ. एस. आर. कट्टीमनी**	५४-५९
१२	आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक योगदान **प्रा. डॉ. साळुंखे यु. ए.** **श्री. अतुल शहाजी देशमुख**	६०-६३

भाग - १ अनुक्रमणिका

अनु क्र.	लेख व लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१३	राजकारणा पलीकडचे यशवंतराव .... **डॉ. संदीप भगवान वाकडे**	६३-६७
१४	यशवंतराव चव्हाण : सुसंस्कृत राजकारणाचा वसा व वारसा **डॉ. शरद बाबुराव सोनवणे**	६८-७३
१५	महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीतील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान **सौ. कविता विजय कुपवाडे**	७४-७८
१६	यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल **प्रा. डॉ. संजय सागरू सपकाळ**	७९-८३
१७	यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विचार व कार्य **प्रा. डॉ. संजीव सुखलाल बोडखे**	८४-८८
१८	यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल **डॉ. विष्णू राणबा पाटील**	८९-९२
१९	प्रभावी वक्ते साहित्य आणि सांस्कृतिचे गाढे अभ्यासक : यशवंतराव चव्हाण **प्रा. परमेश्वर सिद्राम हटकर**	९३-९७
२०	थबथबलेले रसिकत्व : यशवंतराव चव्हाण **प्रा. दिलीप ज्ञानांगाराव भिसे**	९८-१०३
२१	यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य **किशोर कैलास बांबर्डे** **प्रा. डॉ. आघाव एन. बी.**	१०४-१०८
२२	यशवंतराव चव्हाण - अस्पृश्य व नवदीक्षित बौद्धविषयीचे विचार व कार्य **नील जनार्धन नागभिडे** **प्रा. डॉ. विष्णू बब्रुवान वाघमारे**	१०९-११७
२३	यशवंतराव चव्हाण यांच्या निवडक राजकीय कार्याचा आढावा **प्रा. कु. पल्लवी रमेशराव देशमुख**	११८-१२०
२४	यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक विकासातील योगदान **अभिषेक सुभाषराव तांबे** **डॉ. सुनिल अण्णा गोरडे**	१२१-१२४

भाग - १ अनुक्रमणिका

अनु क्र.	लेख व लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
२५	श्री. यशवंतराव चव्हाण यांचे संसदीय लोकशाही आणि राजकीय प्रतिकाराचे विचार **डॉ. निलकंठ कामण्णा लोखंडे**	१२५-१३०
२६	यशवंतराव चव्हणांचे सांस्कृतिक योगदान **डॉ. निकम राजश्री दिलीप**	१३१-१३४
२७	यशवंतराव चव्हाण यांची राष्ट्रीय स्तरावरील वैचारिक भूमिका व कामगिरी **डॉ. प्रसार सुरेश भागवत**	१३५-१४०
२८	इतिहासप्रेमी यशवंतराच चव्हाण **डॉ. रामचंद्र वसंत कुंभार**	१४१-१४७
२९	आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवतराव चव्हाण यांचे योगदान : विशेष संदर्भ सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्र **प्रा. सचिन गोवर्धन कांबळे**	१४८-१५३
३०	आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण **प्रा. संदिप पुंडलिक नन्नावरे**	१५४-१५८
३१	यशवंतराव चव्हाण यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान **प्रा. डॉ. संतोषकुमार धनसिंग कांबळे**	१५९-१६३
३२	आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची राजकीय वाटचाल **डॉ. सरोज पांढरबळे**	१६४-१६८
३३	यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासातील योगदान **डॉ. अनिल बन्सीधर वाघ**	१६९-१७३

८. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक योगदान



प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम

इतिहास विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव, तालुका, आंबेगाव, जिल्हा, पुणे.

प्रास्ताविक

दीन दुबळ्यांच्या प्रश्नांविषयी कळवळा असणारे आणि आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करणारे द्रष्टे नेते म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. यशवंतराव चव्हाण हे चळवळीच्या मुशीतून तयार झालेले एक परिपक्व व्यक्तिमत्व होते. धर्मनिरपेक्ष यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या आचार विचारांच्या प्रभावातून झाली होती.

ह. रा. महाजनी, वि. म. भुस्कुटे, एस. एम. जोशी, आचार्य भागवत अशा दिग्गजांचा सहवास त्यांना तुरुंगात असताना लाभला होता. गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवादाबरोबरच त्यांनी लेनिनचे चरित्र, रशियन राज्यक्रांतीचा इतिहास वाचला होता. सत्यशोधक समाजाचाही त्यांच्यावर प्रभाव होता. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या लिखाणाचा यशवंतरावांच्या मनावर मोठा विलक्षण परिणाम झाल्यामुळे प्रभावित झालेल्या यशवंतरावांनी स्वातंत्र्याचे सामाजिक आणि आर्थिक अंतरंग न्याहाळण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत त्यांचे वक्तव्य होते हेच प्रश्न मला आणि माझ्या मित्रांना सारखे भेडसावीत. आम्ही त्याची चर्चा करीत असू. जमीनदार आणि साधा गरीब शेतकरी यांचं काय करायचं हा प्रश्न होता मात्र त्याआधी स्वातंत्र्य हे आमचं पहिले ध्येय असले पाहिजे याची आम्हाला खात्री पटली होती. प्रस्तुत शोधनिबंधात आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांच्या सामाजिक योगदानाचे विवेचन केलेले आहे.

अल्पपरिचय

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1913 रोजी देवराष्ट्रे जिल्हा सांगली येथे झाला. यशवंतराव चव्हाण यांचे घर एका सामान्य छोट्या शेतकऱ्याचे होते. त्या वर्गाच्या आयुष्यात येणाऱ्या सर्व गोष्टी यशवंतराव लहानपणापासून अनुभवत होते. त्यांना लहानपणापासून वाचनाची खूप आवड होती. वाचनाच्या आवडीमुळेच त्यावेळच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय जागृतीचा मोठा परिणाम त्यांच्यावर झाला होता. भारताच्या राजकीय व सामाजिक वास्तवाचा जो परिचय यशवंतरावांना लहानपणापासून आपोआप होत होता, त्यामुळे राजकीय पारतंत्र्य आणि सामाजिक विषमता हे जटिल प्रश्न त्यांना सतत प्रत्ययाला येत होतेच. यापैकी राजकीय प्रश्नांची सोडवणूक करणारी महात्मा गांधी यांची चळवळ सुरू होती. तर सामाजिक विषमतेविरुद्ध दंड थोपटून उभी असणारी सत्यशोधक चळवळ आणि तिचेच राजकीय पर्यवसान म्हणता येईल अशी असे ब्राह्मणेतर पक्षाचे कार्य हेही तरुण यशवंतराव जवळून पाहत होते. या दोन्ही गोष्टींचा ते वेध घेत होते. एवढेच नव्हे तर या दोन्ही चळवळींमध्ये त्यांचा यथाशक्ती सहभागही होता. अर्थात

यशवंतराव स्वतंत्र प्रज्ञेचे असल्यामुळे त्यांनी विचारपूर्वक सहभागाच्या दिशा आणि मर्यादा स्वतःसाठी आखलेल्या होत्या. कोणत्याही विचाराच्या किंवा विचारसरणीच्या ठोकळेबाज आकलनामध्ये ते अडकून पडले नाहीत. पण या दोन्ही चळवळींचे संस्कार त्यांच्यावर झाले. यातूनच त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक योगदान

समाज हा प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाचे एक महत्त्वाचे अंग आहे. समाजामध्ये घडणाऱ्या घटना, प्रसंगांचा परिणाम त्या व्यक्तीवर होत असतो. कारण या घटना, प्रसंगांतून त्या व्यक्तीची जडणघडण होत असते. यशवंतराव चव्हाणांच्या सामाजिक कार्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला असाच आकार लाभला होता. पुढे राजकीय आंदोलनात त्यांनी स्वतःला झोकून दिले. सविनय कायदेभंगाच्या चळवळीत यशवंतराव चव्हाण सामील झाले. त्यांनी गावोगावी सामाजिक कार्य करण्यास सुरुवात केली. त्यापूर्वीच त्यांनी १९२७ - २८ पासूनच सार्वजनिक कामाला स्वतःला वाहून घेतले होते. गणेशोत्सवात प्रमुखपणे भाग घेणे, सभेसाठी, उत्सवासाठी लोक जमा करणे इत्यादी यशवंतरावांचे सामाजिक कार्य सर्वसामान्य, शेतकरी, मजूर, बहुजन यांच्या लक्षात येऊ लागले. आपला प्रतिनिधी म्हणून लोक त्यांच्याकडे पाहू लागले. त्यातूनच बिळाशी येथील चळवळ यशस्वी करण्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रभर फिरले आणि ती चळवळ यशस्वीपणे पार पाडली.

नवमहाराष्ट्र निर्मिती वेळी शिवनेरी वरून बोलताना यशवंतराव चव्हाणांनी आपल्या ममत्वाची विशालता स्पष्ट करताना म्हटले की, "दुःखात असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणे हे राजाचे कार्य आता प्रत्येक मराठी माणसाने केले पाहिजे. एकेक माणूस, एकेक मूल हे सावली देणारे झाड आहे असे मानून त्यास खतपाणी घातले पाहिजे."[१] महाराष्ट्र राज्यातील नव्हे तर भारत आणि विश्वातील माणसांविषयी यशवंतरावांची हीच धारणा होती. महाराष्ट्र हे जनतेचे राज्य होईल, ते स्वतः लोककल्याणाकरीता झटतील अशी आशा यशवंतरावांनी शिवनेरी वरून बोलताना व्यक्त केली होती.

- यशवंतराव चव्हाण यांनी जनतेच्या प्रगतीचा ध्यास जनतेच्या, समाजाच्या, राज्याच्या आणि देशाच्या उन्नतीला आवश्यक असणारे आणि सदैव उपकारक ठरणारे उपाय, कृती, स्फुरतील त्यांचा आपल्या लोकांना उपदेश आणि राज्य यंत्रणेद्वारे प्रयोग करत राहणे हे त्यांनी आपल्या जीवनाचे एकमेव इतिकर्तव्य मानले होते. यशवंतरावांचे दुसरे श्रद्धास्थान महात्मा गांधी. या श्रद्धाशील नेत्याने कर्तृत्ववान माणसे निर्माण करण्यावर आपली श्रद्धा संपूर्ण आयुष्यात केंद्रित केली. स्वदेशनिष्ठा, आत्मनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा आत्मसात केलेल्या यशवंतरावांना सामाजिक स्वास्थ्याची, सामाजिक विषमता कमी करण्याची तळमळ होती. ही तळमळ आचार विचारातून, कृतीतून, भाषणातून समाजापर्यंत पोहोचवण्याचा त्यांनी अहर्निश प्रयत्न केला. कोणत्याही जातीत न अडकता अभिनवेश न ठेवता सर्व जातींना सामावून घेईल अशा बहुजन समाजाची सत्ता हा नवा शब्दप्रयोग करून त्यांनी नव्या सत्तेची दिशा स्पष्ट केली. बहुजन समाज ही नवी कल्पनाच त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात रुढ केली. "बहुजन समाज म्हणजे जनतेचा प्रवाह ही कल्पना त्यांनी सर्वप्रथम मांडली."[२]

नाशिक येथे सामाजिक परिषदेचे उद्घाटन करताना यशवंतरावजींनी सामाजिक समतेवर भर देऊन आपले विचार प्रभावीपणे मांडले. ते म्हणाले, राजकारण म्हणजे केवळ सत्तेच्या क्षेत्रात काही कारभार करणे वा निवडणुका लढविणे नसून समाज परिवर्तनाचे ते

साधन आहे. हा सिद्धांत या देशातील महान नेत्यांनी जनतेपुढे मांडला. सामाजिक सुधारणावादाला सामाजिक समतेच्या दृष्टीने ज्या गोष्टी अपेक्षित होत्या त्यांचा समावेश राजकारणात झाला. नवसमाज निर्मितीच्या कार्यात सामाजिक समतेचे महत्व विशद करून ते म्हणाले, "नवसमाज निर्मिती हे आता भारताचे एकमेव उद्दिष्ट असून लोकशाही स्वराज्य हे त्याचे साधन आहे. राजकारण हा समाजकारणाचा एक भाग आहे. परंपरागत रुढीने चालत आलेला व माणसांना संघटितपणे एकमेकांविरुद्ध वागण्यास शिकविणारा जातीयवाद हा भारताला शाप ठरला आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे व म्हणून ग्रामीण भागातून सामाजिक सुधारणेचे पाट आपण कसे खेळवितो यावर सामाजिक क्षेत्रातील आपल्या सर्वांच्या श्रमाचे साफल्य अवलंबून आहे. बुद्धीनिष्ठा व समाजनिष्ठ या दोघांचा योग्य मेळ घालून सामाजिक सुधारणेचे कार्य आपणास प्रभावीपणे करावयाचे आहे."[३]

सामाजिक प्रश्नाविषयी मांडणी करताना ते म्हणतात, समाजातील विविध गटातील लोकांचे प्रश्न वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून समजावून घेऊन सोडविण्याचे वृत्त राज्याने हाती घेतले पाहिजे. सामाजिक उदारता अंगी असल्याखेरीज हे व्रत पार पडणार नाही. हे करीत असताना पूजा गुणांची व्हावी, जातीचे नाही. तसेच पंढरपूरच्या चंद्रभागेतील एकत्र होणाऱ्या कार्यक्रमाला ते फक्त भागवत धर्माचा झेंडा नाही तर सामाजिक क्रांतीचा व सुधारणेचा झेंडा मानतात. तसेच महापुरुषांची वाटणी करू नये, त्यामुळे सामाजिक क्रांती होणार नाही असे त्यांनी विचार मांडलेले आहेत. समाज घडविण्याचे स्वप्न यशवंतरावांनी आपल्या उराशी बाळगले होते. ज्या समाजामध्ये प्रत्येक मनुष्य स्वाभिमानाने आपली मान उंच करून निर्भयपणाने जगू शकेल, त्याला पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळेल आणि आपल्या बुद्धीचा व शक्तीचा विकास करण्याची संधी त्याला मिळेल, असा समाज त्यांना घडवायचा होता. राणा चव्हाण यशवंतरावांच्या सामाजिक कार्याविषयी म्हणतात की, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा बंडखोर मार्ग न स्वीकारता मवाळ नेमस्त व प्रागतिक मार्गाचे ते सामाजिक क्षेत्राचे भोक्ते होते. गांधी टोपी त्यांनी शेवटपर्यंत धारण केली. त्यांचे समाजकारण म्हणजे एक चव्हाण मार्ग होता.

यशवंतरावांना असे दिसले की, जे सर्वात महत्त्वाचे प्रश्न समाजासमोर आ वासून उभे होते ते दोन प्रश्न होते. दारिद्र्य आणि सामाजिक विषमता. यापैकी दारिद्र्याच्या प्रश्नाचा विचार मार्क्सने केलेला होता व त्यावर काय तोडगा काढला पाहिजे हे सांगितले होते. सामाजिक विषमता, जातींची उतरंड, उच्च - नीचता अस्पृश्यतेचा प्रश्न वगैरे प्रश्नांची तड लावणारे प्रखर विचार सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा ज्योतिराव फुले यांनी मांडले होते. यशवंतरावांना या दोन्ही विचारधारांची उत्तम माहिती होती. ते काँग्रेसच्या राष्ट्रीय चळवळीत वावरत असले तरी त्यांच्या वैचारिक विश्वात मार्क्स आणि महात्मा फुले यांचे स्थान अनन्यसाधारण होते. सामाजिक विषमतेच्या सर्वांत अक्षम्य अशा उद्रेकामुळे जे अस्पृशतेचे भयंकर भूत आजही खेड्यापाड्यात भरपूर माजलेले आहे त्याची यशवंतरावांना उत्तम कल्पना होती. अस्पृश्यतेविरुद्ध जन्मभर ते निग्रहाने लढले. त्यात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी यशवंतरावांचा संपर्क होता आणि या समाजासाठी काही ना काही प्रत्यक्ष कार्य करण्याची धडपड यशवंतरावांनी केली. अर्थात या जटील समस्येचा व्याप लक्षात घेता जिथे स्वतः शिंदे यांची आयुष्यभर केलेली तपश्चर्या फोल ठरली तेथे यशवंतरावांच्या गाठीला फारसे काही लाभले नाही यात काही नवल नाही. फुले यांच्या तात्विक मांडणीतून पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य उभे राहिले. यशवंतराव चव्हाण ज्या वातावरणामध्ये लहानाचे मोठे झाले त्या सामाजिक, राजकीय, आणि आर्थिक परिस्थितीमध्ये त्यांच्या दृष्टीने

दोन महत्त्वाची उद्दिष्टे उघडपणाने समोर होती. सामाजिक न्याय आणि दारिद्र्य विमोचन. यशवंतरावांच्या मते "भारतासारख्या देशात जेथे बहुसंख्य लोक दारिद्र्याने अज्ञानाच्या अंधकारात पार बुडालेले असतात तेथे लोकशाहीचा वावर केवळ राजकीय क्षेत्रात असेल तर त्या लोकशाहीचा प्रभाव फार मर्यादित असेल. लोकशाही ही खरे तर स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या जीवनमूल्यांची अभिव्यक्ती असते."[४]

यशवंतराव चव्हाण यांचे नेतेपण समाजाच्या खालच्या थरातून आलेले होते. म्हणूनच ते सर्वसामान्य जनतेचे दु:ख काय आहे ते उत्तम रीतीने जाणू शकत असत. त्या दु:खांशी समरस होऊन जनतेचे दु:ख निवारण्याच्या दिशेने निश्चित पावले टाकत असत. दुसरे असे की यशवंतरावांच्या कार्याला पुरोगामी आणि शास्त्रीय विचारांची बैठक होती. त्यांच्या ठायी तळमळ, कळकळ आणि भावनेचा ओलावा आणि त्याचबरोबर दूरदृष्टी होती. त्यांचा मूळ पिंडच लोकशाही समाजवादी माणसाचा असल्याने ते जनतेच्या प्रश्नांशी समरस होत असत. त्या प्रश्नांची उकल करण्यासाठी आपल्या पुरोगामी व शास्त्रीय ज्ञानाधार असलेल्या विचाराने पुढची पावले टाकीत असत. या गुणवत्तेमुळेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्रात तरी समाजवादी समाजरचनेचे ध्येय साध्य करण्यात यशस्वी होतील असा विश्वास वाटत असे. यशवंतरावांच्या मनात खोलवर असलेल्या पददलितांविषयीच्या खऱ्या सहानुभूतीचे उदाहरण पाहण्यासारखे आहे. धार्मिक आणि सामाजिक विषमतेचा पराकोटीचा अविष्कार अस्पृश्यतेच्या प्रश्नांमध्ये दडलेला आहे याची त्यांना तीव्र जाणीव होती. म्हणूनच पददलित अस्पृश्यांच्या समस्या सोडवण्यासाठी योग्य दिशेने त्यांनी पावले टाकली. त्यामध्ये त्यांचे धैर्य आणि दूरदृष्टी तर होतीच परंतु त्याचबरोबर मुलत: अस्पृश्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची तळमळ आणि कळकळही होती. याची प्रचिती दीक्षाभूमीच्या मैदानामध्ये रिपब्लिकन नेत्यांनी आणि नवबौध्दांनी नागपूरला 16 डिसेंबर 1960 रोजी त्यांचा जो सत्कार केला त्यावेळी आली. अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून केलेले कायदे कितीही असले तरी व्यवहारात कायद्यामागचा उदात्त हेतू सफल होताना दिसत नाही.

यशवंतरावांनी कायदा व व्यवहार यांचा मेळ घालण्याचा सतत प्रयत्न केला. मूळ प्रश्न काय आहे हे पाहून आपल्या विचाराने व प्रत्यक्ष कृतीने मुळावरच घाव घालण्याचा त्यांचा प्रघात होता, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. पूर्वीच्या राज्यकर्त्यांना न जमलेले हे कार्य यशवंतरावांनी करून दाखविले. विसाव्या शतकातील महार वतनी गुलामगिरी शेवटी यशवंतरावांनी संपुष्टात आणली. त्यांचे जीवन खेड्यात गेल्याने त्यांना या कामाची पूर्ण कल्पना असणे स्वाभाविक होते. महार वतन ही या समाजाच्या प्रगतीच्या मार्गातील मोठी धोंड होती याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्यांनी गुलामगिरीच्या दावणीतून त्यांना मुक्त केले. अनेक भाषणातून त्यांनी या समाजाला मिळत असलेल्या भेदभावपूर्ण वागणुकीचा उल्लेख करून ते नष्ट करण्याच्या व्यवहार्य सूचना अधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना पुन्हा पुन्हा दिल्या. "हा समाज आता जागृत झाला आहे, तो आपला स्वाभिमान जपणारा असल्यामुळे त्याचे माणुसकीचे हक्क त्याला दिले पाहिजेत, आणि त्यामध्ये उपकाराची भावना नको हेही ते आवर्जून सांगत."[५] नवबौद्ध समाजाला असलेल्या मागास समाजाच्या आरक्षणासारख्या पूर्वीपासूनच्या सवलती धर्मबदलानंतरही दिल्या पाहिजेत ही दृष्टी इतर कोणत्याही राज्यापूर्वी महाराष्ट्र राज्यात त्यांनीच रुढ केली.

महाराष्ट्रातील सामाजिक समस्यांमध्ये अस्पृश्य व नवबौध्द यांच्या समस्या मुख्य आहेत, हे यशवंतराव चव्हाण यांना मान्य होते. अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली म्हणजे आता ती अस्तित्वात नाही, अशा अंतराळी विचारांमध्ये ते कधीच वावरले नाहीत. नवा माणूस निर्माण केला पाहिजे असे यशवंतरावांना मनापासून वाटत होते. याचे प्रत्यंतर म्हणजे आकाशवाणीवरून त्यांनी केलेले 'माझ्या स्वप्नातील खेडे' या विषयावरचे भाषण. त्या भाषणामध्ये पुणे आकाशवाणीच्या श्रोत्यांना त्यांनी आपले मनोगत ऐकवले होते. त्यांच्या मते, "ज्या खेड्यातला समाज आपले सगळे प्रश्न एकमेकांच्या जिव्हाळ्याने आणि समजुतीने सोडविण्यासाठी एकत्र बसून त्यांचा निर्णय करू शकतो, असे पंचायतीचे जीवन जगणारे खेडे तुमच्या माझ्यापुढे असले पाहिजे. पण प्रश्न आहे तो हाच! असे खेडे कसे निर्माण होईल? खेड्याची जातवार पद्धतीची समाजारचना नष्ट केल्याशिवाय स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय अशा नव्या मुल्यांवर आधारलेले नवीन ग्रामीण जीवन कसे उभे राहू शकेल? खेड्यातील जातीय बंधनांच्या आणि जन्मजात उच्च नीचतेच्या चक्रव्यूहामध्ये सापडलेला माणूस मुक्त करून नवा माणूस घडवावा लागेल म्हणजे नवी कोरी समाजरचना निर्माण होईल."[६]

समाजास ज्ञान प्राप्त झाले की व्यक्ती शिक्षित होतील. समाज, राष्ट्र, स्वदेश या संकल्पनांबाबत त्यांचे विचार परिपक्व होतील अशी यशवंतरावांची धारणा होती. ज्ञानामुळे संस्कारक्षम सामाजिक गटाची निर्मिती, स्थानिक समाज आणि स्वदेशाच्या गरजा यामध्ये समन्वय साधण्याबाबत प्रगल्भता निर्माण होईल असे त्यांचे मत होते. प्रत्येक व्यक्तीच्या विकासाचे मुख्य साधन शिक्षण आहे. शिक्षणामुळे व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या प्रगतीला हातभार लागतो हे त्यांना माहीत होते. शिक्षणाबाबत महात्मा फुले यांचे विचार त्यांना प्रभावित करीत होते. ज्ञानवंत होण्याने मनुष्य पशुत्वातून मुक्त होतो असे त्यांना वाटत होते. त्यासाठी सर्व जाती धर्माच्या मुलांना शिक्षण मिळालेच पाहिजे अशी त्यांची तळमळ होती. शिक्षणासाठी त्यांनी आपले मुख्यमंत्री पदही पणाला लावले होते. शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, रयत शिक्षण संस्था यांच्या विकासासाठी यशवंतरावांनी खूप कष्ट घेतले होते. त्यांनी ग्रामीण भागातील शिक्षणावर भर दिलेला होता. समाजाचा विचार करताना देशाचा विचार प्राधान्याने करावा म्हणून ते स्वदेशाबाबतची भावना जागृत करताना म्हणतात, "ज्या हृदयात स्वदेशाविषयी प्रेम नाही, ते हृदय हृदय नसून दगड होय. आपल्या देशासाठी जो आपल्या सर्वस्वाची होळी करतो त्या दिव्यालाच स्वदेश प्रेम म्हणतात. स्वार्थाचा विचार करणाऱ्यांकडून देशसेवा होऊ शकणार नाही."[७]

यशवंतराव चव्हाण बोलके विचारवंत नव्हते तर ते कृतिशील विचारवंत होते. यशवंतरावांना जातीवाद मान्य नव्हता. 1948 साली महात्मा गांधींच्या हत्येनंतर देशात जी जाळपोळ झाली, त्यावेळी त्यांनी ब्राह्मण समाजाला नवी घरे बांधण्यास कर्जे दिली व ती माफ केली, तसेच वाईच्या प्रज्ञा शाळेच्या सरस्वती केवलानंद स्मारकास लाखो रुपये दिले आणि विश्वकोशाचे कार्य तिथेच चालू केले. दलितांबद्दलही त्यांना सहानुभूती होती. 1937 च्या निवडणुकीत आत्माराम बापू पाटील यांचे मित्र आमदार होते. आणि बाळासाहेब खेर मुख्यमंत्री होते. तेव्हा जमिनी वतनाबद्दल फार मोठा मोर्चा आला. पण फक्त दोनच आमदारांचा त्यांना पाठिंबा मिळाला. तेव्हा नव्या जाणिवांनी त्यांनी राजकारण सुरू केले. यशवंतराव चव्हाण यांनी 1958 मध्ये मुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळताना Bombay Inferior village wants abalation act पास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांची इच्छा पूर्ण केली. तसेच दलितांना स्वाभिमानी व स्वावलंबी बनवण्याचे कार्य केले. 1971 साली दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण जनतेसाठी रोजगार

हमी योजना सर्व संमतीने पास केली. या योजनेमुळे दलितांना आणि आदिवासींना घटनेने दिलेल्या लोकशाही हक्कांसाठी खंबीरपणे उभे राहण्यासाठी साधन उपलब्ध करून दिले. सामाजिक कार्य करीत असताना राष्ट्राची एकता आणि एकात्मतेच्या संदर्भात व स्वावलंबी दृष्टिकोनातून विचार मांडून आपले कार्य केले.

यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण

यशवंतराव चव्हाण हे समंजस, उदारमतवादी व सर्वसमावेशक आणि समन्वयवादी नेते होते. आपल्या शत्रूबद्दल देखील ते तिळमात्र अभद्र भाषा बोलत नसत. त्यांनी समाजकारणाचे नितीनियम पाळले. राजकारणाद्वारे समाजकारण आणि समाजकारणाद्वारे राजकारण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सर्व समाजातील प्रज्ञावंतांना मदत केली. त्यासाठी पोषक वातावरण निर्माण केले. दूरदृष्टी विकासात केली. त्यांनी क्षणिक मोहाचे राजकारण /समाजकारण केले नाही. समाजकारणास अर्थकारणाची जोड दिली. समाज विकास करताना सर्वांना सोबत घेऊन चालण्याचे कार्य केले. जातीय सलोखा राखण्याचा प्रयत्न केला. समन्वयवादी भूमिकेतून राजकारणाचा पाया समाजाशी घट्ट जोडला.

त्यांच्या समाजकारणाचे काही महत्त्वाचे पैलू पुढीलप्रमाणे

१. यशवंतरावांची समाज, समाजकारणाची भूमिका ही स्वदेशप्रेमापर्यंतची होती.

२. संकुचित स्वार्थाचा विचार करून समाजकारण करता येत नाही हे त्यांनी आपल्या कृतीने दाखवून दिले.

३. त्यांना संकुचित स्वार्थ, संकुचित जातीयवाद मान्य नव्हता.

४. त्यांचे समाजकारण हे अतिशय व्यापक, पुरोगामी आणि दूरदृष्टीचे होते.

५. त्यांनी राजकारण आणि समाजकारणाच्या माध्यमातून जनतेचे मते जिंकली व त्याप्रमाणे राजकारण व समाजकारण केले.

६. सत्यशोधक समाजाच्या चळवळीनंतर व शेतकरी कामगार पक्षाच्या निर्मितीनंतर बहुजन समाज व उच्चवर्ग यांच्यात अनेक वर्ष निर्माण झालेल्या दुरावा यशवंतरावांनी हळुवारपणे दूर केला.

७. यशवंतरावांनी सर्वच समाजातील मंडळींना वेगवेगळ्या कामांत स्वखुशीने जुंपून दिले. त्यांच्यावर अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्या सोपविल्या. यशवंतरावांचे समन्वयवादी राजकारण होते. त्यामुळे त्यांना स्वातंत्र्योत्तर काळामधील संतोषचे जनक असे मानले जाते.

निष्कर्ष

१. यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक विषमतेचे उच्चाटन करून सामाजिक समता प्रस्थापित केली.

२. यशवंतराव चव्हाण यांनी जातीयवादाला प्रखर विरोध केला.

३. यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक विकासाच्या दृष्टीने सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार केला.

४. आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांनी दुष्काळपिडितांसाठी मोलाचे योगदान दिले.

५. यशवंतराव चव्हाण यांनी समन्वयवादी समाजकारणावर भर दिला.

संदर्भ टिपा

१. एन. डी. पवार यशवंतराव चव्हाण: व्यक्ती आणि वाङ्मय, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१२, पृ. ६०.

२. उत्तम कांबळे, (संपा.), यशवंतराव चव्हाण: नवमहाराष्ट्राचे शिल्पकार, सकाळ प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०१२, पृ.७७.

३. पंजाबराव जाधव, यशवंतराव चव्हाण: जीवनदर्शन, कर्मवीर प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९७०, पृ. ३५.

४. विश्वास नाईकनवरे, महाराष्ट्र भूषण यशवंतराव चव्हाण, गंधर्ववेद प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ. ६३.

५. कित्ता, पृ. १०७.

६. कित्ता, पृ.१०८.

७. गंगाधर वि. कायंदे पाटील, यशवंतराव चव्हाण, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक, प्रथमावृत्ती २०००, पृ.१८३.

८. राम प्रधान यशवंतराव चव्हाण - जीवन प्रवाह, इंडस सोर्स बुक्स, प्रथमावृत्ती, २०१३.

९. यशवंतराव चव्हाण, कृष्णाकाठ, रोहन प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९८४

१०. रामभाऊ जोशी, यशवंतराव इतिहासाचे एक पान केसरी प्रकाशन, १९७६.